**प्रेसनोट दिनांक १६/०७/२०१९**

**अलंकार पोलीस स्टेशन**

**उच्चभ्रू वस्तीतील नागरिकाचे अखेरचे सांगातीही पोलीसच!**

सोसायट्यां मध्ये फ्लॅटची दारं बंद असतात, शेजारी कुणी मेलं तरी कळणार नाही, अशी अतिशयोक्ती केली जाते. पण २ जुलैला ही अतिशयोक्ती न राहाता, प्रत्यक्ष करुण वास्तव ठरले. गुन्हेगारांसमोर कठोर होणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना एकाकी नागरिकाचे अखेरचे सांगातीही व्हावे लागले.

२ जुलै २०१९ रोजी कर्वेनगर येथील मेघना सोसायटीत राहाणाऱ्या नागरिकाने अलंकार पोलीस चौकीत समक्ष येऊन त्यांच्या वरच्या मजल्यावरील घरातून दुर्गंधी येत असल्याची तक्रार केली. लगेचच पोलीस कर्मचारी तिथे गेले. आतून बंद असलेला फ्लॅटचा दरवाजा अग्निशामक दलाच्या मदतीने तोडला. आतीलदृश्यअत्यंतकरुण होते. निरंजन माधव बोडस हे ४९ वर्षांचे गृहस्थ हॉलमध्ये पडले होते, त्यांचे संपूर्ण अंग फुगलेले होते.

पोलिसांनी तत्काळ १०८ क्रमांकाला दूरध्वनी करून रुग्णवाहिकाबोलावून त्यांना ससूनडेड हाउस येथे नेले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

दुर्गंधी आणि शरीराची वाईट अवस्था यांमुळे या पूर्ण प्रक्रियेत तेथील कुणीही स्थानिक नागरिक मदतीस आले नाहीत. सर्व काम फक्त पोलीस कर्मचाऱ्यांनी केले.

बोडसांचे कुणीच नातेवाईक भारतात नाही, अशी माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी त्यांचे बँक खाते असलेल्या कॉसमॉस बँकेच्या अधिकाऱ्यांच्या मदतीने फार हुशारीने त्यांच्या भावाचा क्रमांक मिळवला.

सोसायटीतीलदुर्गंधीने त्रस्त झालेल्या नागरिकांनी पोलिसांच्या कामाचे कौतुक केले व त्यांना धन्यवाद दिले.

परंतु भर वस्तीत राहाणाऱ्या एका मध्यमवयीन माणूस घरात मरून पडला, तर कुणाला खबर नसते, ही आपल्या पांढरपेशा समाजाची शोकांतिका आहे. त्याला कुणी फोन करत नाही, कुणी मित्र, नातेवाईक त्याची आठवण काढत घरी येऊन जात नाहीत, पेपरवाला, दूधवाला, मोलकरीण, वॉचमन, शेजारी यांच्यातील कुणालाच त्यांच्या अनुपस्थितीची जाणीवही होत नाही ? लोक तक्रार करायला गेले, तेही दुर्गंधीची, माणूस उत्तर देत नाही म्हणून नव्हे.

पोलिसांनी त्यांच्या कर्तव्यापलीकडे जाऊन काम केले, हे तर खरेच. पण या प्रसंगी नागरिक म्हणून, शेजारी म्हणून आपण आपल्या कर्तव्याला आणि माणुसकीला चुकत तर नाही ना याचा प्रत्यकाने विचार करण्याची आवश्यकता आहे.